



# दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!






संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे | अंक : २५१ वा | शनिवार दि ०६ डिसेंबर २०२५ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये


# आणखी एका राज्यात भाजपची सत्ता येणार? पडद्यामागून मोठ्या घडामोडी सीएम पलटी मारण्याच्या तयारीत..

**वृत्तसंस्था/मुंबई**

नवी दिल्ली/रांची: बिहारमधील सत्ता कायम राखल्यानंतर आता भारतीय जनता पक्षानं बंगालकडे मोर्चा वळवला आहे. बिहार विधानसभा निवडणूक जिंकताच पंतप्रधान नरेंद्र मोदींनी बिहारी जनतेचे आभार मानताना याबद्दलचे स्पष्ट संकेत दिले. पण बंगालच्या आधी भाजप झारखंडमध्ये चमत्कार करण्याची शक्यता आहे. झारखंडमध्ये भाजप सत्तेत येऊ शकतो. त्यासाठी पडद्याआडून घडामोडी सुरु असल्याची माहिती आहे. झारखंडमध्ये लवकरच नवं समीकरण अस्तित्वात येऊ शकतं. बिहारमध्ये भाजप प्रणित एनडीएला मिळालेल्या दणदणीत विजयानंतर भाजपचे राष्ट्रीय प्रवक्ते अजय आलोक यांनी सोशल मीडियावर १७ नोव्हेंबरला एक पोस्ट केली होती. त्यातून या सगळ्या घटनाक्रमाला सुरवात झाल्याची चर्चा आहे. अब नया बम झारखंड में, हेमंत अब जीवंत होंगें, असं अजय आलोक यांनी पोस्टमध्ये लिहिलं होतं. हेमंत सोरेन झारखंडचे मुख्यमंत्री आहेत. अजय आलोक यांच्या पोस्टनंतर झारखंडमध्ये भाजप आणि सोरेन यांचा झारखंड मुक्ती मोर्चा यांची हातमिळवणी होऊ शकते, अशा चर्चा सुरु झाल्या. तसं झाल्यास १६ वर्षांनी राज्यात भाजप आणि झामुमो युतीचं सरकार येईल. झारखंडमध्ये मुख्यमंत्री हेमंत सोरेन झामुमो, काँग्रेस , राजद आणि डाव्या पक्षांच्या आघाडीचं सरकार चालवत आहेत. सत्तेत सहभागी असलेल्या पक्षांमधील मतभेद बिहार विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर समोर येऊ लागले आहेत. झामुमोला बिहार-झारखंड यांच्या सीमेवरील विधानसभेच्या १२ जागा लढवायच्या होत्या. पण बिहारमधील महागठबंधननं झामुमोला एकही जागा सोडली नाही. बिहार विधानसभेवेळीच झारखंडच्या घाटशीला विधानसभा मतदारसंघात पोटनिवडणूक झाली. त्यात झामुमोच्या सोमेश चंद्र सोरेन यांनी बाजी मारली. त्यांनी भाजपचे उमेदवार बाबू लाल सोरेन यांचा पराभव केला. ते माजी मुख्यमंत्री चंपाई सोरेन यांचे चिरंजीव आहेत. मुख्यमंत्री हेमंत सोरेन आणि त्यांच्या पत्नी कल्पना सोरेन नुकतेच दिल्ली दौरा करुन परतले आहेत. कल्पना सोरेन या आमदार आहेत. मुख्यमंत्री



सोरेन यांनी दिल्लीत केंद्रीय गृह मंत्री अमित शहांची गुप्त भेट घेतल्याची माहिती समोर आली आहे. हेमंत सोरेन आणि काँग्रेस, राजद यांच्यात दुरावा निर्माण झाला आहे. सोरेन यांच्या सरकार आपके द्वार कार्यक्रमात मित्रपक्षांचे मंत्री अनुपस्थित राहिले आहेत. काही काही ठिकाणी कार्यक्रमदेखील रद्द करण्यात आले आहेत. झारखंडमध्ये महाराष्ट्र प्रमाणेच युती, आघाड्यांचं राजकारण चालतं. इथे कायम युती, आघाड्या सत्तेत राहिल्या आहेत. २००५ मध्ये राज्यात झामुमो आणि भाजपचं सरकार आलं होतं. पण २००९ मध्ये त्यांची युती तुटली आणि भाजप सत्तेतून बाहेर पडला. त्यांची जागा राजद, काँग्रेसनं घेतली. आता भाजप आणि झामुमो सोबत आल्यास तब्बल १६ वर्षांनी त्यांची सत्ता येईल.

# महापालिका निवडणुका १५-२० जानेवारी? शिवसेना मंत्र्याचं भाकित, आचारसंहितेबाबतही अंदाज मांडला

**वृत्तसंस्था/ ठाणे**

मतदारयाद्या येत्या १० डिसेंबरपर्यंत प्रसिद्ध होणार आहेत. २२ डिसेंबरला प्रभागनिहाय मतदारयाद्या देण्यात येणार आहेत. यामुळे आगामी महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर १५ ते २० डिसेंबरदरम्यान आचारसंहिता लागू शकते. तसेच १५ ते २० जानेवारीपर्यंत निवडणुकाही होऊ शकतात,फ असे भाकीत परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी ठाण्यात वर्तवले. त्यामुळे येत्या काळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे बिगुल वाजण्याची शक्यता आहे. बीएमसी निवडणूक आणि इतर महापालिका निवडणुकांबाबत उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. प्रताप सरनाईक यांच्या ओवळा-माजिवडा विधानसभा मतदारसंघातील विविध विकासकामांचे भूमिपूजन व लोकार्पण सोहळा गुरुवारी पार पडला. यावेळी ते पत्रकारांशी बोलत होते. ङ्गनिवडणुकीच्या अनुषंगाने शिवसेना कधीही विकासकामे काम करत नाही. ३६५ दिवस आम्ही सर्वसामान्य जनतेत असतो. २४ तास नागरिकांमध्ये राहून आम्ही काम करतो. त्यामुळे निवडणुका कधीही होऊ देत, आमचे शिवसैनिक नेहमीच सज्ज असतात,फ असा विश्वास सरनाईक यांनी व्यक्त केला. यावेळी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिलेल्या निधीतून ठाणे शहरातील विविध भागांत जलतरण तलाव, समाजभवन, स्मशानभूमीचे लोकार्पण करण्यात आले. घोडबंदर रोड येथील आनंदनगर येथे नव्याने उभारण्यात आलेल्या डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम व ज्येष्ठ निरुपणकार आप्पासाहेब धर्माधिकारी अशा दोन जलतरण तलावांचे, तसेच फुटबॉल टर्फचेही लोकार्पण पार पडले. दुसरीकडे, महापालिका निवडणुका लवकरच जाहीर होण्याची शक्यता असल्याने पालिकेतही घडामोडींना वेग आला आहे. पुणे महापालिका आयुक्तांनी गुरुवारी सर्व विभागप्रमुखांची बैठक घेऊन सध्या सुरू असलेली विकासकामे, मान्यता मिळालेले विषय, निविदा प्रक्रिया आणि कार्यादेशांच्या सद्यस्थितीचा आढावा घेतला, तर पालिकेच्या पूर्णत्वास गेलेल्या प्रकल्पांच्या उद्घाटनांचे सत्रही लवकरच सुरू होण्याची चिन्हे आहेत. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका दीर्घकाळ रखडल्या आहेत. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार या निवडणुकांची प्रक्रिया ३१ जानेवारी २०२६ पर्यंत पूर्ण



करणे आवश्यक आहे. त्यानुसार सध्या नगर परिषद व नगर पंचायतींच्या निवडणुका घेतल्या जात आहेत. यानंतर जिल्हा परिषद व पंचायतींच्या निवडणुका व त्यानंतर महापालिकांच्या निवडणुका होतील, असे बोलले जात आहे. मात्र, आधी महापालिका निवडणुका व त्यानंतर जिल्हा परिषद व पंचायतींच्या निवडणुका होतील, अशी जोरदार चर्चा सध्या सुरू आहे. त्यातच राज्य निवडणूक आयोगाने गुरुवारी सर्व महापालिकांच्या आयुक्तांसोबत दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठक घेतल्याने या चर्चांना उधाण आले आहे.

# चाचण्यांचं बोकाळलेलं खूळ



हल्ली फुल चेकअप म्हणजे सर्वांगीण शारीरिक तपासणीचं खूळ बोकाळलं आहे. जशी काय बॉडी नाही, गाडीच आहे! वर्षभरात एक-दोन वेळा गॅरेजला पाठवून दिली की बघायला नको!! अकाली, अकस्मात मृत्यूंच्या वाढत्या बातम्यांमुळे वैयक्तिक आरोग्याच्या चिंतेचं प्रमाण खूप वाढलं आहे, यात शंका नाही. अधिकाधिक दडपणाखालील जीवनशैली देखील याला जबाबदार आहे. परंतु दिवसेंदिवस खर्च करायला उपलब्ध असलेल्या जादा पैशांत होत असलेली वाढ या मानसिकतेला मुख्यतः जोपासत आहे. नेमक्या याच गोष्टींचा फायदा घेऊन हल्ली ङ्ग म या नावाखाली एक प्रचंड मोठा घोटाळा चालवला जात असून, हजारो-लाखो सुशिक्षित लोक त्याला बळी पडत आहेत. ९९९ रुपयांत ९९, १४९९ रुपयांत १००, ३००० रुपयांत २५१ चाचण्या... असल्या मार्केटिंगच्या अत्यंत आकर्षक युक्त्या, तुमच्या घरी, तुमच्या वेळेत येऊन चाचणीसाठी रक्त घेण्याची सेवा या सर्वांची भुरळ न पडली तरच नवल. एवढ्याशा पैशांत इतक्या तपासण्या घरबसल्या होऊन जातील, हा मोह पडतोच. यापासून कॉर्पोरेट क्षेत्रातील रुग्णालये आणि लॅबोरेटरीज् मुक्त तर नाहीतच, उलट चार पावलं पुढेच आहेत. त्यांच्याकडील तो विशेष वातानुकूलित विभाग, अदबीनं इंग्रजीतून बोलणारा तरुण कर्मचारीवर्ग, चहा-बिस्कीटांची सेवा, बिस्लरीच्या बाटल्या... या सगळ्यांनी आपली खात्रीच होते की, किती माझ्या तब्येतीची काळजी घेतली जातेय! मानवी शरीर हे एक अत्यंत किचकट रचना असलेलं यंत्र आहे. आज एकविसाव्या शतकापर्यंत तरी, मानवाला याहून क्लिष्ट आणि तरीपण दमदार, टिकाऊ आणि सक्षम अशा यंत्राची निर्मिती करता आलेली नाही. यात क्वचित प्रसंगी होणाऱ्या एखाद्या बिघाडानं चकित न होता, इतक्या गुंतागुंतीचं हे यंत्र किती कमी वेळा बिघडतं या गोष्टीचा अचंबा करायला हवा. एखादं गणित मांडून किंवा समीकरणानं त्याच्या सुदृढतेचा किंवा बिघाडाचा अंदाज घेण्याचा प्रयत्न करणं निव्वळ हास्यास्पद आहे. आपण प्रत्येकानं कधी ना कधी लॅब रिपोर्ट पाहिलेला आहे. एक लक्षात घेण्यासारखी महत्त्वाची गोष्ट म्हणजे ङ्गनॉर्मलफ या स्तंभात कधीच कुठल्याही तपासणीला एक ठराविक आकडा नसतो, तर ङ्गरेंजफ असते. भूमितीतील पाय् () किंवा भौतिकशास्त्रातील प्रकाशाच्या वेगाला रेंज नाही. तो एक अ-परिवर्तनीय आकडा असतो. पण रक्तदाब, रक्तशर्करा यांसाठी ङ्गरेंजफ आहे. भौतिकशास्त्र आणि जीवशास्त्र यांतील हा मूलभूत फरक आहे. याला शरीराची अत्यंत गुंतागुंतीची रचना हे कारण तर आहेच; शिवाय अनुवांशिकता, वय, शरीरयष्टी आणि प्रकृतीधर्म यांपासून ते दिवसातील कोणत्या वेळी चाचणी झाली इथपर्यंत कित्येक विभिन्न गोष्टींचा परिणाम कोणत्याही चाचणीच्या निष्कर्षांवर होऊ शकतो. ङ्गजर विविध वयोगटांतील, कोणतीही शारीरिक तक्रार नसलेल्या १०० लोकांच्या रक्ताच्या १० वेगवेगळ्या चाचण्या केल्या, तर प्रत्येक चाचणीचे किमान १० टक्के निकाल अ-सामान्य (अबनॉर्मल) येतीलफ, असं आमचे एक शिक्षक म्हणत असत. माझ्या चाळीसहून अधिक वर्षांच्या प्रॅक्टिसमध्ये मी देखील हेच अनुभवलं आहे. कम्प्युटरच्या साह्याने काढलेल्या निष्कर्षांमध्ये बारकाव्यांना जागा नसते. पुस्तकात दिलेल्या ङ्गनॉर्मल रेंजफच्या एक सहस्त्रांशाने जरी एखादा घटक बाहेर-अधिक असेल तरी तो निष्कर्ष लाल, ठळक अक्षरांत आपल्या हातात पडतो. त्या चाचण्या करणाऱ्या यंत्रांचं किंवा निष्कर्ष छापणाऱ्या प्रिंटरचं प्रोग्रामिंगच तसं केलेलं असतं. असला एखादा अ-सामान्य निष्कर्ष आपली झोप उडवून जातो. मग त्यातून निर्माण झालेल्या प्रश्नांचं निरसन करण्यासाठी आणखी चाचण्या केल्या जातात. बऱ्याच वेळा त्यात देखील असाच एखादा अ-सामान्य निष्कर्ष येतो आणि म्हणून मग आणखी चाचण्या... या दुष्टचक्राचे किती फेरे होतील, हे सांगणं कठीण आहे. उपरोक्त विवेचन फक्त रक्ताच्या तपासण्यांचं केलं असलं, तरी थोड्या-फार फरकानं एक्सरे, सोनोग्राफी, ईसीजी या सर्वांना देखील ते लागू पडतं. देवनिर्मित आणि जैविक ( - ) असलं तरी शेवटी शरीर हे एक यंत्र आहे, ही गोष्ट लक्षात ठेवून विचार केला तर असं ध्यानात येईल की, वापराबरोबर (म्हणजेच वयाबरोबर) त्याची आणि त्याच्या प्रत्येक भागाची आणि संस्थेची झीज होणं अटळ आहे. याचा थेट परिणाम म्हणून, वयाबरोबर अनेक चाचण्यांत मिळणारे निष्कर्षांचे आकडे बदलत असतात. बहुधा ही सामान्य गोष्ट असते. परंतु लाल रंगात ठळक अक्षर-आकड्यांत दिलेला निष्कर्ष तुमचं नेहमीचं व्यवहारी शहाणपण तुम्हाला विसरायला लावतो! माझ्या मते, या असल्या चाचण्यांमध्ये सर्व निष्कर्ष ङ्गनॉर्मलफ येणं, यांत याहूनही मोठा धोका आहे; कारण आपण एका फसव्या सुरक्षितपणाच्या उबेत सुखावतो! विविध कारणांमुळे समाजात मलेरिया, क्षयरोग, गॅस्ट्रो इत्यादी आजार आणि ते आजार जिवावर बेतण्याचे प्रसंग फार कमी झालेत; या उलट, उच्च रक्तदाब, मधुमेह, हृदयरोग अशा जीवनशैलीशी निगडीत आजारांचं प्रमाण झपाट्यानं वाढत आहे. खाणं आणि झोप यांच्या अनियमित आणि अनारोग्यवर्धक सवयी, व्यायामाचा अभाव, विविध श्रेणींतील लठ्ठपणा, फास्ट फूड, मद्य आणि तंबाखूजन्य पदार्थांचं सेवन यासारख्या ज्या गोष्टी याला मुख्यत्वे जबाबदार आहेत त्या बदलणं खरं तर आपल्या हातात आहे. पण ङ्गफुल बॉडी चेकअपचा रिपोर्ट नॉर्मल आहेफ या धीरामुळे माणसाला दुसरी काहीही काळजी घेण्याची गरजच भासत नाही! हे किती धोकादायक आहे! स्वतःच्या मनानं किंवा जाहिराती, गुगल, मित्र, व्हॉट्सॲप असल्या बिनबुडाच्या ठिकाणांहून मार्गदर्शन घेऊन चाचण्या करण्यातही धोका आहे. वैद्यकीय चक्रव्यूहातून योग्य निदानापर्यंत पोचण्याचा मार्ग श्रीकृष्णाप्रमाणे फक्त तुमचा डॉक्टरच दाखवू शकतो... सामान्य ज्ञान नव्हे आणि गुगल तर नक्कीच नाही.




The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# भाजपला दुसरे 'नितीश' सापडले? घडामोडींना वेग; शहांची 'ती' भेट चर्चेत, लवकरच धमाका?

**रांची :** बिहारमधील सत्ता राखल्यानंतर आता आणखी एका राज्यात भाजपचं सरकार येण्याची शक्यता आहे. बिहारच्या शेजारीच असलेल्या झारखंडमध्ये लवकरच सत्ता बदल होऊ शकतो. पडद्यामागे सुरु असलेल्या घडामोडी पाहता झारखंडमध्ये सत्तांतर होण्याची शक्यता वाढली आहे. मुख्यमंत्री हेमंत सोरेन आणि त्यांच्या आमदार पत्नी कल्पना यांनी नुकताच दिल्ली दौरा केला. या दौऱ्यात त्यांनी भाजपच्या वरिष्ठ नेत्यांची भेटीगाठी घेतल्याची चर्चा आहे.






झारखंडमध्ये सोरेन यांचा झारखंड मुक्ती मोर्चा सत्तेत आहे. काँग्रेस, राजद आणि डाव्या पक्षांच्या साथीनं सोरेन सरकार चालवत आहेत. गेल्याच महिन्यात बिहारमध्ये विधानसभा निवडणूक पार पाडली. त्या निवडणुकीत झामुमोला १२ जागा लढवायच्या होत्या. पण राजद, काँग्रेसच्या गठबंधननं झामुमोला एकही जागा सोडली नाही. त्याचं शल्य सोरेन यांच्या मनात आहे. तेव्हापासून सोरेन यांचे काँग्रेस, राजद सोबतचे संबंध ताणले गेल्याची चर्चा आहे. या सगळ्या पार्श्वभूमीवर सोरेन यांचा दिल्ली दौरा महत्त्वाचा ठरला.मुख्यमंत्री सोरेन यांचा दिल्ली दौरा, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी याच दरम्यान झारखंडचे राज्यपाल संतोष गंगवार यांची घेतलेली भेट यामुळे चर्चेला उधाण आलं. सोरेन यांचा दौरा आणि शहा-गंगवार भेटीचं टायमिंग पाहता झारखंडमध्ये सत्ता बदलाच्या चर्चांना वेग आला आहे. बिहार विधानसभा निवडणुकीत महागठबंधनचा झालेला दारुण पराभव पाहता सोरेन वेगळा विचार करु शकतात. विशेष म्हणजे सोरेन आणि त्यांच्या पत्नी एक ठरलेला कार्यक्रम सोडून अचानक दिल्लीला रवाना झाले होते. याच सुमारास अमित शहा आणि राज्यपाल संतोष गंगवार यांचीही भेट झाली.झारखंडमध्ये गेल्या वर्षी विधानसभेची निवडणूक झाली. राज्यात विधानसभेच्या एकूण ८१ जागा आहेत. बहुमतासाठी ४१ जागांची गरज असते. झामुमोनं ३४ जागा जिंकल्या. तर भाजप २१ जागांवर विजयी झाला. काँग्रेसनं १६, राजदनं ३, डाव्या पक्षांनी २ जागांवर यश मिळवलं. सध्या झामुमोची राज्यात सत्ता आहे. सोरेन यांनी एनडीएमध्ये प्रवेश केल्यास ते मुख्यमंत्रिपदी कायम राहू शकतात. भाजप सरकारमध्ये येऊ शकतो. नितीश कुमार यांनी २०१७ मध्ये असा प्रयोग केला होता.असाच काहीसा प्रकार नोव्हेंबर जुलै २०१७ रोजी बिहारमध्ये घडला होता. २०१५ मध्ये नितीश कुमार यांचा जेडीयू, लालू प्रसाद यादव यांचा राजद आणि काँग्रेसनं आघाडी करत निवडणूक लढवली. भाजप विरोधात त्यांनी विजय मिळवला. या आघाडीनं सत्ता स्थापन केली आणि नितीश कुमार मुख्यमंत्री झाले. पण २०१७ मध्ये नितीश कुमार यांनी भाजप सोबत जाण्याचा निर्णय घेतला. त्यांनी भाजपशी हातमिळवणी केली. मुख्यमंत्रिपद त्यांच्याचकडे कायम राहिलं.

## इच्छुक उमेदवारांना द्यावा लागतोय जिवंत असल्याचा पुरावा

**नाशिक :** मतदारयाद्यांमधील घोळ हा सध्या प्रचंड चर्चेचा विषय ठरलेला आहे. असं असताना आता नाशिकमधून एक धक्कादायक प्रकार समोर येत आहे. इथे आगामी नाशिक महापालिका निवडणुकीसाठी इच्छुक असलेल्या उमेदवारांचे नाव हे चक्क कागदोपत्री मृत असल्याचा धक्कादायक दावा समोर आला आहे. संबंधित इच्छुक उमेदवारांनी याबाबत संबंधित अधिकाऱ्यांची देखील भेट घेतली आहे. यावेळी अधिकाऱ्यांचं उत्तर ऐकून इच्छुक उमेदवारबी चक्रावले आहेत. आपण जिवंत आहात आणि तुमचं नाव यादीत समाविष्ट करुन घेण्यासाठी कोर्टाचा आदेश घेऊन या, असा आदेश संबंधिक अधिकाऱ्यांनी या इच्छुक उमेदवारांना दिल्याने हा विषय सध्या चांगल्याच चर्चेत आहेत. कागदोपत्री मृत्यू झालेले हे उमेदवार खरंच निवडणूक इच्छूक असतील तर कागदोपत्री त्यांचे 'भूत' निवडणूक लढणार का? असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित होत आहे.येणाऱ्या



महानगर पालिकेतील काही इच्छुक उमेदवारांची नावेच मतदार यादीतून गायब झाले आहेत. त्याची त्यांनी चौकशी केली असता जिवंतपणी त्यांना मृत झाल्याचा दाखला देत या कारणास्तव आपले नाव मतदार यादीत नाल्याचे सांगण्यात आले आहे. या अजब कारभारामुळे जिवंत असलेले, पण कागदोपत्री मयत दाखवलेले इच्छुक उमेदवार आता उच्च न्यायालयाचा दरवाजा खटकावणार आहेत.नाशिकच्या सिडको परिसरातील विविध प्रभागातून भारतीय जनता पक्षाकडून इच्छुक असलेल्या अविनाश पाटील आणि उत्तम अर्जुन काळे उमेदवारांना चक्क कागदोपत्री मृत घोषित करण्यात आले आहे.

## खडसेंवर चंद्रकांत पाटील यांची खोचक टीका

**जळगाव :** मुक्ताईनगर शहर तर प्रचंड चर्चेत राहीलं. विशेष म्हणजे शिवसेनेचे आमदार चंद्रकांत पाटील आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार एकनाथ खडसे यांच्यातील वाद प्रचंड टोकाला पोहोचताना दिसत आहेत. तसेच भाजपच्या केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे आणि शिवसेनेचे चंद्रकांत पाटील यांच्यातही वाकयुद्ध रंगलेलं आहे. असं असताना चंद्रकांत पाटील यांनी मतदानानंतर एकनाथ खडसेंवर अतिशय खोचक शब्दांत टीका केली आहे. त्यांनी खडसेंना सराईत गुन्हेगार असं म्हटलं आहे. त्यावर खडसेंनी देखील प्रत्युत्तर दिलं आहे.'एकनाथ खडसे सराईत गुन्हेगार आहेत. त्यांनी कोट्यवधी रुपये चोरले आहेत. त्यांनी अनेक गोष्टी केलेल्या आहेत. त्यांनी भर स्टेजवर एखाद्या बाईची इज्जत घेतल्याने कलम ५०९ सारखा गुन्हा त्यांच्यावर दाखल आहे. सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांच्या संदर्भातला गुन्हा त्यांच्यावर दाखल आहे. ते किती मोठे गुन्हेगार आहेत', अशी टीका चंद्रकांत पाटील यांनी केली आहे.

## शहांचा आदेश, मायक्रो प्लानिंग, हेल्प सेलसोबत संघही मैदानात

**दिल्ली :** विधानसभा निवडणुकीत दणदणीत विजय मिळवणाऱ्या भाजप नं स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी संपूर्ण ताकद पणाला लावली आहे. या निवडणुकांमध्ये क्रमांक एकचा पक्ष ठरण्यासाठी भाजपनं आक्रमक व्यूहनीती आखली आहे. अनेक ठिकाणी भाजप मित्रपक्षांच्या विरोधात निवडणूक लढत आहे. याकडे मिशन २०२९ ची तयारी म्हणून पाहिलं जात आहे.भाजपला राज्यात कुबड्यांची गरज नाही, असं विधान केंद्रीय गृहमंत्री अमित शहांनी गेल्याच महिन्यात केलं. भाजप २०२९ मध्ये राज्यात स्वबळावर लढेल, ही घोषणा शहांनी मागील वर्षी विधानसभा निवडणुकीच्या दरम्यानच केली आहे. त्यासाठी भाजपनं गेल्या वर्षभरात पद्धतशीरपणे प्रयत्न केले आहेत. आता भाजपनं आपला मतांचा टक्का वाढवण्यासाठी पावलं टाकली आहेत.२०१४ ते २०२४ या कालावधीत विधानसभेच्या ३ आणि लोकसभेच्या ३ निवडणुका झाल्या. या निवडणुका भाजप




कधी स्वबळावर, तर मित्रपक्षांसोबत युती करत लढला. पण भाजपच्या मतांची टक्केवारी २५ ते २८ च्या दरम्यान राहिली. राज्यात एकहाती सत्ता आणायची असल्यास भाजपला किमान ४० टक्के मतं मिळवावी लागतील. त्यासाठीची रणनीती भाजपनं आखली आहे.मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अखत्यारित येणाऱ्या वैद्यकीय मदत कक्षानं सामाजिक संस्थांच्या मदतीनं तीन मोठ्या कार्यक्रमांचं आयोजन केलं आहे. सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या मागास असलेल्या जातीपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न भाजपकडून केला जाणार आहे. बंजारा, लमाणी, वाल्मिकी या सारख्या समूहांपर्यंत पोहोचण्याचा भाजपचा प्रयत्न आहे.

## ठाकरेंचा 'रिव्हर्स गियर' ; शिंदेंची डोकेदुखी वाढली, भाईसमोर दुहेरी आव्हान

**मुंबई :** राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका सुरु असताना भाजप आणि शिंदेसेनेत संघर्ष वाढला आहे. ठाणे, सिंधुदुर्ग, हिंगोलीसह अनेक जिल्ह्यांमध्ये महायुतीमधील दोन पक्षच एकमेकांसमोर उभे ठाकलेले असताना उद्धव ठाकरे सक्रिय झाले आहेत. विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर बॅकफूटवर गेलेल्या ठाकरे यांनी शिंदेंना शह देण्यास सुरुवात केली आहे. याची सुरुवात एकनाथ शिंदे यांच्या बालेकिल्ल्यापासून झालेली आहे.गेल्या २ दिवसांपासून मातोश्रीवर पक्षप्रवेशांना वेग आला आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कोपरी-पाचपाखाडी विधानसभा मतदारसंघातील शिंदेसेनेचे उपविभागप्रमुख आबा मोरे यांच्यासह जवळपास २०० कार्यकर्त्यांनी मंगळवारी मातोश्री गाठत ठाकरेसेनेत प्रवेश केला. शिवसेनेच्या इतिहासातील सगळ्यात मोठं बंड केल्यानंतर एकनाथ शिंदे यांच्या गटाला पक्ष आणि चिन्ह मिळालं. ठाण्यातील जवळपास संपूर्ण संघटना शिंदेंसोबत गेली. पण आता शिंदे यांना भाजपकडून ठाण्यात आव्हान मिळू लागलं आहे. त्यातच आता काही पदाधिकाऱ्यांनी 'रिव्हर्स गियर' टाकल्यानं शिंदेंची अडचण होताना दिसत आहे.भाजपचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या कल्याण-डोंबिवलीत शिंदेसेना-भाजपमध्ये प्रचंड जुंपली आहे. चव्हाण यांनी पक्षप्रवेशांचा अक्षरशः धडाका लावलेला आहे. त्यातच आता उद्धव ठाकरेंनीदेखील शिंदेंना धक्का दिल्याची चर्चा आहे. स्थानिक माजी नगरसेवकांकडून दुय्यम वागणूक मिळत





असल्याचा आणि गेल्या ९ वर्षांत त्यांनी स्थानिकांचं एकही काम न केल्याचा आरोप करत कोपरीतील जुने शिवसैनिक आणि पदाधिकाऱ्यांनी केला. कोपरीत आम्हाला आमच्याच पक्षात कोणी वाली नसल्याची भावना उपविभागप्रमुख आबा मोरे यांनी बोलून दाखवली.ठाण्यात रिव्हर्स गियर पडून २४ तासही उलटले नसताना शेजारच्या नवी मुंबईतही शिंदेसेनेला हादरा बसला.

तिथल्या पदाधिकाऱ्यांनी परतीचे दोर लावत ठाकरेसेनेत प्रवेश केला. शिंदेसेनेचे बेलापूर विधानसभा मतदारसंघाचे सहसंपर्कप्रमुख शिरीश पाटील, उपविभागप्रमुख मयूर ठाकूर, संदीप साळवे यांच्यासह अन्य पदाधिकाऱ्यांनी मातोश्रीवर येऊन उद्धव ठाकरेंच्या उपस्थितीत प्रवेश केला.आतापर्यंत भाजपकडून शिंदेसेनेच्या पदाधिकाऱ्यांना गळाला लावलं जातं. त्याची तक्रार करण्यासाठी शिंदे यांना दिल्ली गाठली आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहांकडे भाजप प्रदेशाध्यक्षांची तक्रार केली. पण आता शिंदेसेनेचे पदाधिकारी घरवापसी करु लागल्यानं शिंदेंसमोर दुहेरी आव्हान आहे. एकीकडे भाजप, तर दुसरीकडे ठाकरे अशा दोन आघाड्यांवर शिंदेंना लढावं लागणार आहे.

# नागपुरात डॉक्टर तरुणीने झोपेतच बॉयफ्रेंडला संपवलं, स्वत:वर वार करत बनाव रचला

**नागपूर :** प्रेमसंबंध संपुष्टात आणताना झालेल्या वादातून डॉक्टर असलेल्या प्रेयसीने चाकूने छातीवर वार करून प्रियकराची हत्या केली. त्यानंतर स्वत:वरही वार करून प्रियकराने खुनाचा प्रयत्न केल्याचा बनाव केल्याची थरारक घटना नंदनवन पोलिस ठाण्याच्या हद्दीतील नंदनवन कॉलनी येथे उघडकीस आली. या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे.बालाजी विनायक कल्याणे (वय २८, रा. मुदखेड, जि. नांदेड) असे मृताचे तर रितू देशमुख (वय २५, दोन्ही रा. मुदखेड, जि.नांदेड) असे मारेकरी प्रेयसीचे नाव आहे.बालाजी हा एकवर्षापूर्वी नागपुरात आला. तो नंदनवन कॉलनीतील खोली भाड्याने घेऊन स्पर्धा परीक्षा व पोलिस भरतीचे प्रशिक्षण घेत होता. पोलिसांकडून प्राप्त माहितीनुसार, रितू व बालाजी दोघेही नातेवाइक आहेत. गेल्या




चार वर्षांपासून त्यांचे प्रेमसंबंध आहेत. बीएएमसच्या शिक्षणासाठी ती नागपुरात आली होती. ती नंदनवन पोलिस ठाण्याच्या हद्दीतच अन्यत्र भाड्याने राहते. रितू सध्या इंटर्नशीप करीत आहेत. बालाजी नागपुरात आल्यानंतर दोघांच्या गाठीभेटी वाढल्या. त्याने तिला लग्नाची मागणी घातली. मी उच्च शिक्षित आहे. तू सध्या बेरोजगार आहे. आपले लग्न होणे आताच शक्य नाही, असे ती त्याला म्हणायची.लग्नाबाबत वडिलांशी बोल, असेही तिने त्याला अनेकदा म्हटले. यावरून दोघांमध्ये खटके उडायचे. बुधवारीही बालाजीने रितूला लग्नाची मागणी घातली. तिने नकार दिला. बालाजीने लग्नाचा हट्ट धरला. वडिलांसोबत बोल, असे रितू बालाजीला म्हणाली. बालाजीने रितूच्या वडिलांच्या मोबाइलवर फोन केला. रितूच्या वडिलांनी त्याची समजूत घातली. नोकरी नसताना मी मुलीचे लग्न कसे करू, असे रितूचे वडील त्याला म्हणाले. त्यानंतर पुन्हा दोघांमध्ये वाद झाला. रितू ही बालाजीसोबत त्याच्या घरी आली. दोघेही झोपी गेले.गुरूवारी पहाटे साडे तीन वाजताच्या सुमारास रितू जागी झाली. तिने घरातील चाकू घेतला. बालाजीच्या छातीवर चाकूने तब्बल चार वार केले. त्याचा मृत्यू झाला. त्यानंतर बचावासाठी रितूने चाकूने स्वत:च्या कपाळवर आणि छातीवर वार केले. त्यानंतर तिने आरडाओरड करायला सुरूवात केली. शेजारी राहणारा बालाजीच्या मित्राला जाग आली. त्याने बालाजीच्या घराचा दरवाजा ठोठावला. काही वेळाने रितूने दरवाजा उघडला. बालाजी रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या त्याला दिसला. रितू जखमी होती. तो घारबला. स्वत:ला सावरत त्याने रितूला विचारणा केली. तेव्हा ती म्हणाली की, बालाजीने आधी माझ्यावर चाकूने वार केले. त्यानंतर त्याने स्वत:च्या छातीवर वार करून आत्महत्या केली, अशी माहिती तिने बालाजीच्या मित्राला दिली. दरम्यान, अन्य शेजारीही जमले. एका नागरिकाने नंदनवन पोलिसांना माहिती दिली. माहिती मिळताच पोलिसांचा ताफा तेथे पोहोचला.

## नजरानजर होताच प्रेमात पडले, तरुणाने मावशीलाच पत्नी केलं

**लखनऊ :** प्रेमात वेड्या झालेल्या एका तरुणाने स्वतःच्याच मावशीशी लग्न केल्याची विचित्र घटना समोर आली आहे. उत्तर प्रदेशातील कौशांबी येथे ही घटना घडल्याची माहिती आहे. त्यांचे कुटुंब त्यांच्या या निर्णयावर नाराज होते. पण, या दोघांना एकमेकांशी लग्न करायचं होतं. जेव्हा हे प्रकरण पोलिसांपर्यंत पोहोचले तेव्हा मोहब्बतपूर पइंसा पोलिस स्टेशनचे अधिकारी राजेंद्र कुमार वर्मा आणि त्यांच्या टीमने मध्यस्थी करत दोघांच्या कुटुंबियांना समजावलं. त्यानंतर त्यांनी या दोघांना एका मंदिरात नेले आणि त्यांचं लग्न लावून दिलं. या लग्नाची सर्वत्र चर्चा होत आहे. पण, हे दोघे त्यांच्या या निर्णयाने अत्यंत आनंदी आहेत.

मोहब्बतपूर पइंसापरिसरातील जगन्नाथपूर येथील रहिवासी भोला प्रसाद यांचा मुलगा कृष्ण कुमार (२४) हा मजुरीचे काम करतो. तीन वर्षांपूर्वी तो चित्रकूट जिल्ह्यातील राजापूर पोलीस स्टेशन परिसरातील कानकोट गावात त्याच्या



आजीच्या घरी गेला होता. तिथे त्याची भेट संजना देवी (२३) सोबत झाली. संजना देवी नात्यात त्याची मावशी होती. एकमेकांना पाहिल्यानंतर ते त्यांच्यातील नातं विसरून प्रेमात पडले. सुरुवातीला ते फोनवर बोलत होते. परंतु हळूहळू त्यांच्या संभाषणांचे रूपांतर प्रत्यक्ष भेटींमध्ये झाले.प्रेमी युगुल त्यांच्या कुटुंबियांपासून लपून भेटू लागले. त्यांनी एकत्र जगण्याचं ठरवलं. जेव्हा त्यांच्या कुटुंबियांना त्यांच्या प्रेमाची माहिती मिळाली, तेव्हा त्यांनी या दोघांच्या भेटण्यावर निर्बंध लावले. यामुळे दोन्ही कुटुंबांमध्येही दुरावा निर्माण झाला, परंतु कृष्णा आणि संजना एकमेकांशी लग्न करण्यावर ठाम होते.या प्रकरणी अनेक वेळा पंचायतही बसली.

## विवाहित महिलेशी प्रेम संबंध, लाखो रुपये घेतले

**रायगड :** उरणच्या शेलघरमध्ये एका विवाहित महिलेवर वर्षभर अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. आरोपीने लग्नाचे खोटे आमिष दाखवून पीडितेकडून तब्बल १२ लाख ३५ हजार रुपयांच्या महागड्या वस्तू आणि रोख रक्कम उकळली. इतकंच नाही, तर आरोपीने पीडितेच्या अल्पवयीन मुलीवरही लैंगिक अत्याचार केला. या प्रकरणी उरण पोलिसांनी आरोपीला अटक केली असून पुढील तपास सुरू आहे.मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी आणि पीडित विवाहित महिलेचे काही काळापूर्वी प्रेमसंबंध होते. याच संबंधाचा गैरफायदा घेत आरोपीने नोव्हेंबर २०२४ पासून नोव्हेंबर २०२५ पर्यंत पीडितेच्या घरी जाऊन तिला लग्नाची खोटी आश्वासने दिली. या काळात त्याने पीडितेकडून महागड्या वस्तू आणि रोख रक्कम घेतली. पीडित महिलेने तक्रार दाखल करू नये, यासाठी आरोपीने दोघींना जीवे मारण्याची धमकी दिली होती. शेवटी, पीडित महिलेने धाडस करून उरण पोलीस ठाण्यात धाव घेतली आणि तक्रार दाखल केली.

## पब्जी काय खेळताय, काहीतरी नोकरी करा ; पत्नीने टोकताच संतापला अन्..

**भोपाळ :** एका नवविवाहित महिलेचा मृतदेत तिच्या घरात सापडल्याने परिसरात एकच खळबळ माजली. नेहा पटेल असं या महिलेचं नाव असल्याची माहिती आहे. तिच्याच पतीने तिची हत्या केल्याचा आरोप आहे. मध्य प्रदेशातील रीवा जिल्ह्यातील गुढ पोलिस ठाणे क्षेत्रात ही घटना घडल्याची माहिती आहे. पबजी गेम खेळण्यावरुन झालेल्या वादातून पतीने पत्नीची हत्या केल्याचा आरोप करण्यात आला आहे.याप्रकरणी मिळालेल्या अधिक माहितीनुसार, ५ मे २०२५ ला नेहा पटेलचं लग्न गुढवा येथील रहिवासी रंजित सोबत झालं होतं. ६ महिन्यांपूर्वीच या दोघांचा विवाह झाला होता. अग्नीच्या भोवती सात फेरे घेत त्यांनी आयुष्यभर सोबत राहण्याचं वचन दिलं. मात्र, अवघ्या सहा महिन्यात त्यांच्या संसाराता उद्धवस्त झाला आहे.याप्रकरणी मिळालेल्या अधिक माहितीनुसार, पती रंजितला पबजी गेम खेळण्याचं व्यसन होतं. त्यामुळे त्याचे आपल्या पत्नीसोबत वाद होत होते. तो



सतत तिच्यावर माहेरुन हुंडा आणण्यासाठी दबाव टाकत होता. पण, नेहाच्या माहेरचे हुंडा देण्यास असमर्थ होते. त्यामुळे त्यांच्यात या प्रकरणावरुन सतत वाद होत राहायचे. रंजित पटेल हा कुठलंही काम करत नव्हता, तो एक बेरोजगार होता. इतकंच नाही, तर तो दिवसभ फक्त पबजी खेळत राहायचा, ना कुठला कामधंदा ना नेहाला घरकामात कामी मदत करायचा. पत्नीने काही काम सांगितलं तर तेही तो करत नसे. मंगळवारी (२ डिसेंबर) याच कारणावरुन त्यांच्यात मोठा वाद झाला. घटनेच्या रात्री पत्नी नेहाने रंजितला पबजी खेळण्यापेक्षा काही नौकरी करण्याचा सल्ला दिला. यावरुन तो संतापला आणि त्याने दुपट्ट्याने नेहाचा गळा आवळला.

# डॉक्टर होण्याचं स्वप्न विरलं, MBBS च्या चार विद्यार्थ्यांचा एकाच रात्री मृत्यू, बॉम्बस्फोटासारखा आवाज झाला अन्..

**लखनौ :** डॉक्टर होण्याचं स्वप्न पाहणाऱ्या चौघा मित्रांना ऐन तारुण्यात मृत्यूने कवेत घेतलं. श्री वेंकटेश्वरा विद्यापीठात एमबीबीएसचे शिक्षण घेणाऱ्या चौघा विद्यार्थ्यांचा उत्तर प्रदेशातील अमरोहा येथे झालेल्या भीषण रस्ते अपघातात मृत्यू झाला. वेगात असलेल्या कारने महामार्गाच्या कडेला उभ्या असलेल्या फोमच्या गाद्यांनी भरलेल्या कँटरला मागून धडक दिली. या धडकेत कारचा चक्काचूर झाला आणि कारमध्ये अडकलेल्या चारही विद्यार्थ्यांचा जागीच मृत्यू झाला. दिल्ली-मुरादाबाद महामार्गावर बुधवारी रात्री नऊ वाजताच्या सुमारास हा अपघात घडला.गजरौलाच्या दिशेने वेगात येणारी दिल्ली पासिंगची स्विफ्ट डिझायर



कार महामार्गाच्या कडेला उभी असलेल्या कँटरमध्ये घुसली. अपघाताची तीव्रता इतकी जास्त होती की बॉम्बस्फोटासारखा आवाज झाला आणि कारचे पूर्णपणे तुकडे झाले.धडकेनंतर मोठा स्फोट झाल्यासारखा आवाज झाल्यामुळे अपघाताच्या ठिकाणी लोकांची गर्दी जमली आणि महामार्गावर वाहतूक कोंडी झाली. माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले. क्रेनच्या मदतीने कँटरमध्ये अडकलेली कार बाहेर काढण्यात आली. कारमध्ये अडकलेल्या विद्यार्थ्यांचे मृतदेह बाहेर काढण्यासाठी पोलिसांना कारचे तुकडे करावे लागले.मृत विद्यार्थ्यांची ओळख पटवण्यात आली आहे. यामध्ये दिल्ली येथील द्वारकाचा रहिवासी आयुष शर्मा, त्रिपुरा येथील सप्त ऋषि दास, अर्णव चक्रवर्ती आणि श्रेष्ठ पंचोली यांचा समावेश आहे. हे सर्व विद्यार्थी श्री वेंकटेश्वरा विद्यापीठाचे विद्यार्थी होते. एमबीबीएसचे शिक्षण पूर्ण करुन इंटर्नशिप करत होते. ते २०२० च्या बॅचचे विद्यार्थी होते.विद्यापीठाचे प्रति कुलगुरू राजीव त्यागी यांनी घटनास्थळी पोहोचून दु:ख व्यक्त केले. त्यांनी तातडीने विद्यापीठाच्या कर्मचाऱ्यांकडून विद्यार्थ्यांचा तपशील मागवून मृतांची ओळख पटवली. प्रत्यक्षदर्शींच्या म्हणण्यानुसार, अपघाताचा आवाज इतका मोठा होता की जणू काही बॉम्बस्फोट झाला असावा.पोलिसांच्या माहितीनुसार, कारची गती १०० किलोमीटर प्रति तास पेक्षा जास्त असावी. अचानक महामार्गाच्या कडेला उभी असलेली कँटर पाहून चालक घाबरला असावा आणि कार अनियंत्रित झाली. कार चालवणारा विद्यार्थी होता आणि त्याने हँडब्रेकचा वापर केला नाही. जर त्याने हँडब्रेकचा वापर केला असता, तर कदाचित कार पलटी झाली असती.

# भारताला विकेट मिळताच कोहली नाचू लागला; बाबा जी का ठुल्लू म्हणत कोणाला डिवचलं?

**रायपूर :** भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेतील दुसरा सामना बुधवार, ३ डिसेंबर २०२५ रोजी रायपूर येथील शहीद वीर नारायण सिंग आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर खेळवण्यात आला. भारतीय संघाला चार विकेट्सनी पराभव पत्करावा लागला, पण तळीरीं घेहश्रळ सामन्यावर वर्चस्व गाजवले. प्रथम, विराटने ९३ चेंडूत १०२ धावांची शानदार खेळी केली, ज्यामध्ये सात चौकार आणि दोन षटकार मारले. आता दक्षिण आफ्रिकेचा फलंदाज बाद झाल्यानंतर विराटने जे केलं त्याची जोरदार चर्चा सुरु आहे.३५९ धावांच्या विशाल लक्ष्याचा पाठलाग करताना, दक्षिण आफ्रिकेच्या संघाची सुरुवात खराब झाली. अनुभवी दक्षिण आफ्रिकेचा



यष्टीरक्षक-फलंदाज पाचव्या षटकात अर्शदीप सिंगकडे बाद झाला.१० चेंडूत आठ धावा काढल्यानंतर डी कॉक ३० यार्ड अंतरावर मिड-ऑनवर वॉशिंग्टन सुंदरने झेल दिला. सुंदरने झेल पूर्ण करताच, कॅमेरा विराट कोहलीवर केंद्रित झाला आणि विराटचा आनंद हा गगनात मावेनासा झाला होता.दक्षिण आफ्रिकेचा यष्टीरक्षक फलंदाज क्विंटन डी कॉकला बाद केल्यानंतर विराट कोहलीचा 'नागिन डान्स' सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. भारतीय वेगवान गोलंदाज अर्शदीप सिंगने डी कॉकला बाद केले, ज्यामुळे भारतीय संघाला पहिले यश मिळाले. त्यानंतर विराट कोहलीने नागिन डान्स केला. बाबाजी का ठुल्लू म्हणतानाचा व्हिडिओ आता सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे.भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील एकदिवसीय मालिकेतील दुसरा सामना बुधवारी खेळला गेला. विराट कोहलीने ९३ चेंडूत १०२ धावा केल्या, ज्यामध्ये सात चौकार आणि दोन षटकार मारले. हे त्याचे ५३ वे एकदिवसीय शतक होते. या सामन्यात त्याने आणि ऋतुराज गायकवाड यांनी तिसऱ्या विकेटसाठी १९५ धावांची मोठी भागीदारी केली. ऋतुराज गायकवाड यांनी ८३ चेंडूत १०५ धावा करत त्यांचे पहिले एकदिवसीय शतकही केले. भारतीय संघाने अखेर सामना गमावला. प्रथम फलंदाजी करताना टीम इंडियाने ३५८ धावा केल्या. प्रत्युत्तरादाखल, दक्षिण आफ्रिकेने शेवटच्या षटकात विजय मिळवला. एडेन मार्कारामने शतक झळकावले, तर डेवाल्ड ब्रेव्हिस आणि मॅथ्यू ब्रिट्झके यांनीही अर्धशतके झळकावली. दक्षिण आफ्रिकेच्या विजयाने तीन सामन्यांच्या मालिकेत १-१ अशी बरोबरी झाली.

## आगरकर यांनी मिटींगपासून पळ काढला पण आता.. टेंशन जबरदस्त वाढलं

**दिल्ली :** बीसीसीआयने दुसऱ्या वनडे साम न्यापूर्वी खास बैठक बोलावली होती. पण अजित आगरकर हे या बैठकीला गैरहजर राहीले आणि त्यांनी बैठकीपासून पळ काढण्याचा प्रयत्न केला. अजित आगरकर यांनी मोठी खेळी केली. आपल्या जागी एका खेळाडूला त्यांनी बैठकीला पाठवले. पण बीसीसीआय ही काय चीझ आहे, हे त्यांना अजून समजलेले दिसत नाही. कारण आता बीसीसीआय एक मोठं पाऊल उचललं आहे, जे अजित आगरकर यांच्यासाठी घातक असल्याचे समोर येत आहे. या संपूर्ण गोष्टीची इनसाईड स्टोरी आता समोर आलं आहे.रोहित शर्मा आणि विराट कोहली यांचा अजित आगरकर व गौतम गंभीर हे दुस्वास करतात, त्यांना सापत्न वागणूक देतात, असे बीसीसीआयला समजले होते. रोहित आणि विराट यांच्यावर या दोघांनी टांगती तलवार आणली होती. पण त्यानंतर रोहित



शर्मा आणि विराट कोहली हे दमदार फॉर्मात आले. त्यानंतर रोहित शर्मा आणि विराट कोहली यांनी या दोघांचा जाहीरपणे विरोध करायला सुरुवात केली. विराट कोहलीने सामनावीर पुरस्कार मिळाल्यावर गौतम गंभीर यांना टोला लगावला होता. त्यानंतर बीसीसीआयने अजित आगरकर आणि गौतम गंभीर यांच्यासाठी खास बैठक बोलवली होती.अजित आगरकर यांना या बैठकीत नेमकं काय होणार आहे, हे समजले असावे. त्यामुळे अजित आगरकर यांनी या बैठकीला जाणे टाळले. आपल्याजागी यावेळी अजित आगरकर यांनी आपल्या निवड समितीमधील रोहित शर्माच्या मित्राला बैठकीला पाठवले, जेणेकरून तो सुवर्णमध्य काढू शकतो. पण बीसीसीआयने यावेळी ही बैठकच टाळली. त्यामुळे अजित आगरकर यांची ही मोठी खेळी निष्फळ ठरली.अजित आगरकर यांची चाल बीसीसीआयला समजली आणि त्यांनी आता अजित आगरकर यांना एक मोठा धक्का दिला आहे. बीसीसीआयने ही बैठक आता पुढे ढकलली आहे. त्यामुळे आता तिसऱ्या वनडे सामन्यानंतर आता ही बैठक होणार आहे. त्यामुळे अजित आगरकर यांची चाल ओळखून बीसीसीआयने त्यांना आता धक्का दिला आहे. निवड समिती आणि गौतम गंभीर हे काय करत आहेत, हे आता संघातील काही सदस्याकडून समजले आहे. त्यामुळे या दोघांना वॉर्निंग देण्याचे काम बीसीसीआय या बैठकीत करू शकते, असे म्हटले जात आहे.

## रोहित शर्माचा निर्णय, वनडे मालिका संपल्यावर काय करणार

**रांची :** मालिकेनंतर काय करायचं, याबाबतचा मोठा निर्णय आता रोहित शर्माने घेतला आहे. रोहित शर्माच्या या निर्णयामुळे चाहते चांगलेच सुखावलेले आहेत.रोहित शर्माने गत वर्षीच स्पर्धात्मक टी-२० लढतींचा निरोप घेतला आहे. भारताला टी-२० वर्ल्ड कप स्पर्धेत विजेते केल्यानंतर रोहितने ही घोषणा केली होती. त्यानंतरही रोहित मुश्ताक अली राष्ट्रीय टी-२० स्पर्धेतील मुंबईच्या बाद फेरीच्या लढती खेळण्यास उत्सुक असल्याचे समजते. स्पर्धेतील बाद फेरीच्या लढती १२ ते १८ डिसेंबर दरम्यान इंदूर येथे होणार आहेत. भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील वन-डे मालिकेत सध्या रोहित खेळत आहे. या मालिकेतील तिसरी लढत शनिवारी आहे. भारताची त्यानंतरची वन-डे ११ जानेवारीस न्यूझीलंडविरुद्ध आहे. त्याच वेळी मुंबईने मुश्ताक अली स्पर्धेच्या प्राथमिक साखळीतील सुरुवातीच्या चारही लढती जिंकल्या आहेत. त्यामुळे मुंबईचा बाद फेरीतील प्रवेश निश्चित



आहे. 'रोहितने मुश्ताक अली स्पर्धेच्या बाद फेरीती लढती खेळण्याची तयारी दाखवली आहे. त्याबाबतचा अंतिम निर्णय लवकरच होईल,' असे मुंबई क्रिकेट संघटनेतील सूत्रांनी सांगितलेरोहित शर्मा विजय हजारे वन-डे स्पर्धेत खेळण्याची दाट शक्यता आहे. या स्पर्धेच्या प्राथमिक साखळीतील लढती २४ डिसेंबर ते ८ जानेवारी दरम्यान आहेत. त्यात मुंबईचा समावेश एलिट विभागातील 'क' गटात आहे. त्यात सिक्कीम, उत्तराखंड, हिमाचल प्रदेश, महाराष्ट्र, पंजाब तसेच गोव्याचा समावेश आहे. मुंबईच्या सर्व लढती जयपूरला होणार आहेत.

## पंतही संघाबाहेर, गंभीर यांची टांगती तलवार घ्यावा लागला निर्णय

**मुंबई :** भारताचा टी २० संघ जाहीर झाला. या संघात ऋषभ पंतला संधी देण्यात आलेली नाही. यापूर्वी पंत भारताच्या तिन्ही संघांत होता. पण आता मात्र त्याला फक्त कसोटी संघात स्थान दिले आहे. गौतम गंभीर यांची टांगती तलवार त्याच्यावर असल्याचे म्हटले जात आहे. त्यामुळे जे रोहित शर्मा आणि विराट कोहली यांनी जे केलं, तेच आता ऋषभ पंतही करणार असल्याचे आता समोर आले आहे.बीसीसीआयच्या निवड समितीचे अध्यक्ष अजित आगरकर आणि टीम इंडियाचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांनी पुढील वर्ल्ड कप वनडे स्पर्धेचे नियोजन करताना विराट, रोहित यांच्या भवितव्याबद्दलही अंतिम निर्णय घेण्याची



तयारी केली आहे. मात्र विराट, रोहित या माजी कर्णधारांनी सातत्यपूर्ण कामगिरी करत गंभीर आणि आगरकर यांना आपल्याच निर्णयाचा पुनर्विचार करण्यास भाग पाडले आहे. ऑस्ट्रेलियातील वनडे मालिकेपासून या दोघांनीही फलंदाजीचा धडाका सुरू केला. त्यात रोहित आणि विराट यांनी देशांतर्गत स्पर्धेत खेळण्याची तयारीही दाखवली आहे. त्यामुळे रोहित, विराट वनडे क्रिकेटमधील आपली 'इनिंग' आणखी प्रदीर्घ करणार असा कयास आहे.विराट कोहली, रोहित शर्मा या भारताच्या सीनिअर फलंदाजांसह भरवशाचा यष्टीरक्षक ऋषभ पंत यानेही बुधवारी विजय हजारे देशांतर्गत वनडे स्पर्धेत खेळणार असल्याचे बुधवारी स्पष्ट झाले. विजय हजारे स्पर्धेस २४ डिसेंबरपासून सुरुवात होत आहे. टीम इंडियाच्या खेळाडूंनी उपलब्धतेनुसार देशांतर्गत स्पर्धेत भाग घेण्याची सूचना मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांनी केली होती. विराट आणि ऋषभ पंत यांच्या समावेशामुळे दिल्लीचा संघ मजबूत वाटू लागला आहे. मंगळवारी मुश्ताक अली टी-२० स्पर्धेच्या लढतीत दिल्लीला अनपेक्षित पराभवास सामोरे जावे लागले होते.

विराट आणि पंतच्या समावेशाने दिल्ली संघाचा आत्मविश्वास वाढेल. विराट २०१० नंतर प्रथमच हजारे स्पर्धेत खेळणार आहे. विराटने या स्पर्धेतील पाच सामन्यांत ४५.८०च्या सरासरीने २२९ धावा फटकावल्या असून यात दोन अर्धशतकांचा समावेश आहे. यंदाच्या स्पर्धेतील दिल्लीच्या गट लढती ८ जानेवारीपर्यंत आटोपणार आहेत. त्यानंतर ११ जानेवारीपासून भारत-न्यूझीलंड वनडे मालिकेला बडोद्यातील सामन्याने सुरुवात होणार आहे.

# गौरव खन्ना नाही; तर मग बिग बॉस १९'च्या ट्रॉफीवर कोणाचे नाव?



**मुंबई :** सलमान खानचा रिॲलिटी शो 'बिग बॉस १९' चा आता शेवटचा आठवडा सुरू आहे. गेल्या आठवड्यात अशनूर कौर, शहबाज यांनी बिग बॉसच्या घराचा निरोप घेतला. तर मिड वीक एविक्शनमध्ये मालती चहर घराबाहेर गेली. बिग बॉसला या सीझनचे टॉप ५ स्पर्धक भेटले आहेत. अशात सुरुवातीपासून गौरव खन्ना 'बिग बॉस १९' ची ट्रॉफी उचलणार असल्याची चर्चा पाहायला मिळत आहे. मात्र आता गौरव खन्ना नाही तर एका वेगळ्यात सदस्याची विजेता म्हणून चर्चा पाहायला मिळत आहे.

सोशल मीडियावर गौरव खन्नासोबत विजेते पदासाठी महाराष्ट्रीयन भाऊ प्रणित मोरेच्या नावाचीही तुफान चर्चा पाहायला मिळत आहे. प्रणित मोरे 'बिग बॉस १९'चा विजेता व्हावा असेल महाराष्ट्रातील जनतेला मोठ्या संख्येने वाटत आहे. प्रणित मोरेला प्रेक्षकांकडून मते



देखील मिळत आहे. तसेच मीडिया रिपोर्टनुसार, घरातील सदस्यांचे मत देखील आहे की, प्रणित मोरे विजेता व्हावा. 'बिग बॉस १९' च्या घरातून आतापर्यंत बाहेर पडलेल्या स्पर्धकांपैकी अनेकजण प्रणित मोरेला पाठिंबा देतात. आता 'बिग बॉस १९'चा विजेता नेमका कोण ठरणार हे ग्रँड फिनालेला पाहायला मिळेल.

सलमान खानचा शो 'बिग बॉस १९' चा ग्रँड फिनाले ७ डिसेंबर रोजी रात्री ९.०० वाजता जिओ सिनेमा आणि डिस्ने+ हॉटस्टारवर पाहायला मिळणार आहे. तसेच कलर्स टीव्हीवर रात्री १०:३० वाजता पाहू शकते.

# इन्फ्लुएन्सर प्यारी मरियमच निधन, प्रसूतीदरम्यान घेतला अखेरचा श्वास

**दिल्ली :** मनोरंजन सृष्टीतून धक्कादायक बातमी समोर आली आहे. लोकप्रिय इन्फ्लुएन्सर आणि टिकटॉक स्टार प्यारी मरियमचे निधन झाले आहे. प्रसुतीदरम्यान इन्फ्लुएन्सरने अखेरचा श्वास घेतला आहे. यात तिच्या दोन्ही जुळ्या बाळांचे देखील निधन झाले आहे. इन्फ्लुएन्सरच्या अशा अचानक निधनामुळे तिच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. तसेच तिच्या चाहत्यांना मोठा धक्का बसला आहे.

प्यारी मरियम आई होणार होती त्यामुळे तिच्या घरात आनंदाचे वातावरण होते. मात्र तिच्या मृत्यूने नवऱ्याला मोठा धक्का बसला आहे. प्यारी मरियम आणि तिचा नवरा सोशल मीडियावर व्हिडीओ बनवायचे. त्यांचा मोठा चाहता वर्ग आहे. या कठीण काळात मरियमच्या कुटुंबासोबत तिचे चाहते उभे आहेत. तिच्या आत्म्याला शांती लाभो ही प्रार्थना ते करत आहेत. प्यारी मरियमच्या अशा जाण्याने कंटेंट क्रिएटर्सना मोठा धक्का बसला आहे.




प्यारी मरियम ही पाकिस्तान आणि इतर देशांमध्ये अत्यंत लोकप्रिय सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर होती. तिचे लग्न इन्फ्लुएन्सर अहसान अली यांच्यासोबत झाले होते. प्रसूतीदरम्यान प्यारी मरियमची तब्येत अचानक बिघडली. डॉक्टरांच्या प्रयत्नांनंतरही ती आणि तिच्या जुळ्या बाळांचा दुर्दैवी मृत्यू झाला. प्यारी मरियमच्या सुरेल आवाजाचे चाहते दिवाने होते. तिचा इन्स्टाग्रामवर मोठा फॅन फॉलोइंग आहे.

प्यारी मरियमने अलिकडेच आपल्या प्रेग्नेंसी न्यूज चाहत्यांना दिली होती. ती आपला प्रेग्नेंसीचा काळ मस्त आनंदात घालवताना दिसत होती. तिला नवरा खूप पाठिंबा द्यायचा. आयुष्यातील नवीन आनंद साजरा करायला दोघेही खूपच खुश होते.

# झाडं आमचे आई-बाप, त्यांच्यावर हल्ला झाल्यास गप्प बसणार नाही

**नाशिक :** नाशिकमधील तपोवन येथील प्रस्तावित वृक्षतोडीला अभिनेते आणि पर्यावरण प्रेमी सयाजी शिंदे यांनी कडाडून विरोध केला आहे. 'झाडं हे आमचे आई-बाप आहेत, त्यांच्यावर हल्ला झाल्यास आम्ही गप्प बसणार नाही,' असा इशारा शिंदे यांनी दिला आहे.



कुंभमेळा किंवा सण उत्सवांना आपला विरोध नाही, मात्र त्यासाठी हजारो झाडांची कत्तल करणे चुकीचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच, झाडांचे ट्रान्सप्लांटेशन यशस्वी होत नाही आणि उजाड माळरानावर झाडं जगणार नाहीत, असे सांगत त्यांनी प्रशासनाच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. नितेश राणे यांच्या टीकेलाही त्यांनी यावेळी उत्तर दिले. झाडांची कत्तल करून पर्यावरणाचा ऱ्हास होऊ देऊ नका, असे आवाहन त्यांनी सरकारला केले आहे.

# 'मिसेज देशपांडे' चित्रपटामध्ये माधुरी

**पुणे :** अभिनेत्री माधुरी दीक्षित स्वत:चा आगामी चित्रपट 'मिसेज देशपांडे'मधून एका नव्या अवतारासह प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या रोमांचक थ्रिलरपटाला १९ डिसेंबर रोजी प्रदर्शित केले जाणार आहे. नागेश कुकुनूर यांच्याकडून दिग्दर्शित या चित्रपटाचा टीझर प्रदर्शित करण्यात आला आहे.



याच्या प्रीह्यूत माधुरी अत्यंत साध्या आणि ग्लॅमरस अवतारात दिसून येत आहे. ती शांतपणे भाज्या चिरताना आणि चित्रपटाचे गाणे गुणगुणताना दिसून येते, तर एका रेडियो बुलेटिनमध्ये एका सीरियल किलरविषयी सांगण्यात येत असल्याचे यात दिसून येते. कुकुनूर मूव्हीजच्या सहकार्याने अप्लॉज एंटरटेन्मेंटकडून निर्मित हा चित्रपट फ्रेंच थ्रिलर 'ला मोन्ते'चे हिंदी वर्जन आहे. माधुरीसोबत या चित्रपटात सिद्धार्थ चांदेकर आणि प्रियांशु चटर्जी हे कलाकारही मुख्य भूमिकेत आहेत.

मिसेज देशपांडे माझ्यासाठी खरोखरच एक मनोरंजक प्रवास राहिला आहे. कहाणीवर काम सुरू असताना मी मुख्य भूमिकेत केवळ माधुरीलाच पाहिले होते आणि तिला या अवघड भूमिकेला साकारताना पाहणे माझ्यासाठी अत्यंत आनंदाची बाब होती असे दिग्दर्शन कुकुनूर यांनी म्हटले आहे. मिसेज देशपांडे हा मी यापूर्वी केलेल्या कुठल्याही चित्रपटापेक्षा वेगळा असल्याचे माधुरीने म्हटले आहे. तर मिसेज देशपांडे हा चित्रपट १९ डिसेंबरपासून जियो हॉटस्टारवर स्ट्रीम होणार आहे.

# बायोपिकमध्ये झळकणार श्रद्धा

**पुणे :** मागील वर्षी 'स्त्री २' चित्रपटाद्वारे प्रेक्षकांचे भरपूर मनोरंजन करणारी अभिनेत्री श्रद्धा कपूरच्या नव्या चित्रपटाबद्दल माहिती समोर आली आहे. श्रद्धाने आता 'छावा' चित्रपटाचे दिग्दर्शक लक्ष्मण उतेकर यांच्यासोबत आगामी चित्रपटासाठी हातमिळवणी केली आहे. हा एक बायोपिक असून यात श्रद्धा एका महान व्यक्तिमत्त्वाची भूमिका साकारताना दिसून येईल. श्रद्धाच्या या आगामी चित्रपटाचे नाव 'ईथा' असल्याचे समजते. याचे चित्रिकरणही सुरू झाले आहे. हा चित्रपट प्रसिद्ध लावणी कलाकार राहिलेल्या विठाबाई नारायणगावकर यांचा बायोपिक असून यात श्रद्धा त्यांची व्यक्तिरेखा साकारताना दिसून येणार आहे. समाजात महिलांना स्वत:चे कौशल्य आणि कला दाखविण्याची संधी नसलेल्या काळात विठाबाई यांनी लावणीनृत्याद्वारे लोकांची मने जिंकली होती. विठाबाई



यांना तमाशासम्राज्ञी असे म्हटले जात होते. 'ईथा' चित्रपटात श्रद्धा ही विठाबाई नारायणगावकर यांचा संघर्ष, ध्यास आणि निर्धाराची कहाणी मोठ्या पडद्यावर साकारणार आहे. तसेच श्रद्धा कपूर ही पुढील काळात स्वत:च्या प्रियकरासोबत एका बायोपिकवर काम करत आहे. या चित्रपटाचे कामही सुरू झाले आहे. परंतु यासंबंधी अधिक माहिती अद्याप समोर आलेली नाही. श्रद्धा कपूर पहिल्यांदाच बायोपिकमध्ये दिसून येणार असल्याने तिचे चाहते उत्सुक झाले आहेत.

# राऊतवाडी केंद्रात उत्साहाच्या वातावरणात श्री गुरुचरित्र पारायण सोहळा संपन्न!

## ४९० स्वामींच्या सेविकाऱ्यांनी गुरुचरित्र पारायण केले वाचन...






जनसंचलन/बुलढाणा

साक्षात् दत्तावतारी श्री नृसिंह सरस्वती यांच्या लीलांचे वर्णन करणारा श्री गुरुचरित्र हा पवित्र ग्रंथ. याचे सप्ताह पारायण नुकतेच बुलडाणा शहरातील राऊतवाडी केंद्र येथे मोठ्या भक्तिमय आणि उत्साहाच्या वातावरणात दि ५ डिसेंबर रोजी संपन्न झाले. मार्गशीर्ष महिन्याच्या पहिल्या दिवशी दि २८ नोव्हेंबर रोजी सुरू झालेल्या या पारायणामध्ये ४९० हून अधिक स्वामी सेवेकरी यांनी सहभाग घेतला. गेले सात दिवस चाललेल्या या सामूहिक पारायण सोहळ्यामुळे संपूर्ण परिसर दत्तनामाच्या जयघोषाने दुमदुमून गेला होता. पहाटेपासून ते सायंकाळपर्यंत भाविक मोठ्या श्रद्धेने या ग्रंथाचे वाचन आणि श्रवण करण्यासाठी उपस्थित होते. गुरुचरित्र पारायणामुळे केवळ व्यक्तिगत उन्नती होत नाही, तर सामूहिक पारायणामुळे समाजात एकोपा आणि सकारात्मकता वाढते. या वर्षीचा उत्साह अभूतपूर्व होता. या गुरुचरित्र पारायण सोहळ्यासाठी शहरातील सेवेकरी आले आणि शहराबाहेरी आजूबाजूला खेडेगावातील सुद्धा सेवेकरी मोठ्या संख्येने गुरुचरित्र पारायण सोहळ्यात सहभाग घेतला. सात दिवस चाललेल्या या पारायण सोहळ्याची समाप्ती ५ डिसेंबर रोजी झाली या दिवशी महाप्रसादाचे आयोजन सुद्धा करण्यात आले होते मोठ्या संख्येने सेवेकरी या महाप्रसादाचा लाभ घेतला आहे.

# महापरिनिर्वाण दिनानिमित्त रक्तदान शिबिर व अभिवादन कार्यक्रम...

### बुलढाण्यात सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे आयोजन

जनसंचलन/बुलढाणा



विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त दरवर्षीप्रमाणे यंदाही ६ डिसेंबर रोजी शहरातील जयस्तंभ चौकस्थित गांधी भवन प्रांगणात सकाळी ९ ते दुपारी ३ वाजेच्या कालावधीत रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच सायंकाळी ६ वाजता अभिवादन कार्यक्रम पार पडणार असल्याची माहिती महात्मा जोतिराव फुले व विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीकडून देण्यात आली आहे.

महापरिनिर्वाण दिनाला रक्तदान शिबिर घेवून गरजूंना मदत करण्याची परंपरा लाभली आहे. त्यानुसार, यंदाही विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना रक्तदानाच्या माध्यमातून अभिवादन करण्यात येणार आहे. सामान्य रुग्णालयात रक्त पिशव्यांची कमतरता असल्याने अनेक गोरगरीब रुग्णांची गैरसोय होते. त्यांना रक्त टंचाई भासू नये व आरोग्याविषयी अडचणी निर्माण होवू नये, ही बाब लक्षात घेवून रक्तदान शिबिराचे आयोजन होत असते. त्यामुळे, या रक्तदान शिबिरात तसेच अभिवादन कार्यक्रमात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे २०२५ चे अध्यक्ष पत्रकार निलेश राऊत यांनी केले आहे.




# नांदेडमध्ये अग्रनारी प्रांतीय महिला अधिवेशन अग्रणारी पुरस्काराने

## बुलढाण्याच्या कुसुम अग्रवाल होणार सन्मानित

जनसंचलन/बुलढाणा



बुलढाणा राज्यातील अग्रवाल समाजाच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक उन्नतीसाठी काम करणारी संघटना आग्रा नारी प्रांतिक महिला संघटनेची नांदेड शाखा यावर्षी ३ आणि ४ जानेवारी २०२६ रोजी अग्रसेन भवन, नांदेड येथे भव्य राज्यस्तरीय महिला अधिवेशनाचे आयोजन करत आहे. महाराष्ट्र राज्य अग्रवाल परिषदेचे अध्यक्ष विजयकुमार चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली आणि अथक प्रयत्नांनी १९७८ मध्ये ही संघटना स्थापन झाली. संघटनेला गती देण्यात मीना अग्रवाल, मालती गुप्ता (सध्याचे प्रांतिक अध्यक्ष), कमलेश यांनी महत्त्वाची भूमिका बजावली अग्रवाल, उषा अग्रवाल, सपना अग्रवाल, सुमित्रा भारुका आणि निर्मला अग्रवाल (संभाजीनगर मराठवाडा विभागीय अध्यक्ष) यांनी विशेष योगदान दिले आहे. अधिवेशनात अमृता फडणवीस राजेश्वरी मोदी (राजदीदी, आध्यात्मिक गुरू आणि प्रेरक वक्ता), नवनीत राणा (माजी खासदार, भाजप) आणि चैतन्य गुरु मा पूनम गोयल (कोटा) उपस्थित राहणार आहेत. अधिवेशन यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी, नांदेड शाखेच्या प्रमुख अधिकाऱ्यांमध्ये स्वागत अध्यक्षा म्हणून सरला मोदी, कार्याध्यक्षा म्हणून कल्पना चौधरी, वरिष्ठ उपाध्यक्ष म्हणून निशा अग्रवाल आणि सारिका भारतीया, गिरिजा शंकर गुप्ता, प्रदीप मोदी आणि योगेश अग्रवाल हे देखील आयोजन समितीचे सक्रिय सदस्य आहेत. कार्यक्रम व्यवस्थेचे समन्वय साधण्यासाठी चौदा उपसमित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. कार्यक्रम अ ३ जानेवारी रोजी सायंकाळी ५:३० वाजता सुरू होईल. सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये भुर्ते सितारेआणि अग्र नारी पुरस्कार वितरण समारंभांचा समावेश असेल. रविवार, ४ जानेवारी रोजी दीपप्रज्वलन, पुष्पहार अर्पण, पाहुण्यांचे स्वागत समारंभ आणि अध्यक्षीय भाषण आणि पाहुण्यांचे प्रेरणादायी मार्गदर्शन असेल.

# प्रामाणिकपणाचे दर्शन आजही जिवंत...

## सापडलेली पैशाची पर्स आणि मोबाईल पोलीस स्टेशनमध्ये मूळ मालकास केला परत!

जनसंचलन/बुलढाणा

आजच्या धकाधकीच्या जीवनात जिथे अनेकदा स्वार्थाची भावना वाढीस लागते, तिथे अंकुश श्रीपाद पडघान वय ५९ रा. बोरगाव काकडे ता. चिखली येथील नागरिकाने दाखवलेला अनोखा प्रामाणिकपणा कौतुकास्पद ठरला आहे. अंकुश पडघान यांना चिखली वरून बुलढाणा कडे येताना केळवद फाट्या समोर पैशाची पर्स आणि महागडा मोबाईल फोन सापडला. त्यांनी कोणताही विचार न करता थेट स्थानिक पोलीस स्टेशनमध्ये जमा केला. आज सकाळी चिखली वरून बुलढाणा कडे येत असताना केळवद फाट्याजवळ त्यांना एक पर्स आणि मोबाईल सापडला त्यामध्ये काही पैसे होते. त्यांच्या मनात विचार आला की ज्या व्यक्तीचे हे असेल, ती खूप काळजीत असेल. क्षणाचाही विलंब न लावता त्यांनी पोलीस स्टेशनमध्ये घेऊन जाण्याचा निर्णय घेतला, आणि ते थेट शहर पोलीस स्टेशन येथे आले. आणि सापडलेले दोन्ही मौल्यवान वस्तू (पर्स आणि मोबाईल) पोलीस अधिकारी पीएसआय मोरे यांच्याकडे सुपूर्द केले. या पर्समध्ये सुमारे ३००० रोख रक्कम,व मोबाईल सुरक्षितपणे जमा करून मूळ मालकाचा तपास केला. छाया शेषराव नेवरे रा. जांभोरा यांना दिला.अंकुश पडघान यांनी समाजात एक आदर्श निर्माण केला आहे.

# मलकापूर पांग्रा येथे कर्जबाजारीपणातून शेतकऱ्याची आत्महत्या

जनसंचलन/ सिंदखेड राजा



तालुक्यातील मलकापूर पांग्रा येथील संतोष जनार्दन काकडे (वय ४०) या शेतकऱ्याने कर्जबाजारीपणातून आणि सततची नापिकी यामुळे मानसिक तणावात शेतातील जांबाच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना मंगळवारी उघडकीस आली. या प्रकरणी संतोष यांचे भाऊ दारासिंग जनार्दन काकडे (वय ५०) यांनी साखरखेर्डा पोलीस स्टेशनमध्ये दिलेल्या तोंडी रिपोर्टवरून मर्ग दाखल करण्यात आला आहे. दारासिंग काकडे यांनी दिलेल्या माहितीनुसार, संतोष काकडे हे त्यांच्या पत्नी व मुलांसह शेतात राहत होते. यावर्षी अतिवृष्टीमुळे पीक आले नाही. त्याचबरोबर आजारपणासाठी मोठा खर्च झाल्याने ते कर्जात बुडाले होते. त्याच्याकडे दोन एकर शेती होती आणि बँकेचे ५० हजार रुपयाचे कर्ज तसेच नातेवाइकांकडून घेतलेले हात उसने पैसे यामुळे ते सतत चिंतेत राहत होते. कुटुंबीय त्यांना समजावत असत, तरीही ते मानसिक तणावातून बाहेर पडू शकले नाहीत. दरम्यान, १ डिसेंबर २०२५ रोजी रात्री कुटुंब झोपल्यानंतर संतोष बाहेर गेले. दुसऱ्या दिवशी सकाळी सुमारे ६ वाजता पत्नी वंदना यांनी शोध घेतला असता ते शेतातील जांबाच्या झाडाला सुती दोरीने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळले. कुटुंबीयांनी तत्काळ गावात ही बाब कळविली. शेतावर पोहोचताच संतोष मृतावस्थेत असल्याचे निदर्शनास आले. याप्रकरणी साखरखेर्डा पोलिसांनी मर्ग दाखल केला असून पुढील तपास साखरखेर्डा पोलीस स्टेशनचे ठाणेदार गजानन करेवाड यांच्या नेतृत्वात बीट जमादार निवृत्ती पोफळे करीत आहेत.

# राज्य विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन ८ ते १४ डिसेंबर कालावधीत नागपूर येथे होणार

जनसंचलन/बुलढाणा

महाराष्ट्र विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन सोमवार दि. ८ ते रविवार दि. १४ डिसेंबर २०२५ या कालावधीत नागपूरमध्ये होणार आहे. दि. १३ डिसेंबर शनिवार आणि दि. १४ डिसेंबर रविवार शासकीय सुट्टीच्या दिवशीही दोन्ही सभागृहाचे कामकाज घेण्याचा निर्णय विधिमंडळ कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत घेण्यात आला आहे. विधानभवन येथे विधिमंडळ कामकाज सल्लागार समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती.बैठकीला विधान परिषद सभापती प्रा.राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, विधानपरिषद उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, उच्च व तंत्र शिक्षण व संसदीय कार्यमंत्री चंद्रकांतदादा पाटील, महसूल




मंत्री चंद्रशेखर बावनकुळे,जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील, सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार, विधानसभा सदस्य सर्वश्री सुधीर मुनगंटीवार,दीपक केसरकर, जितेंद्र आव्हाड, भास्कर जाधव, सुनील प्रभू,अमीन पटेल विधानपरिषद सदस्य अनिल परब, प्रसाद लाड, प्रवीण दरेकर, विक्रम काळे, सतेज पाटील, विधिमंडळाचे सचिव जितेंद्र भोळे संबंधित अधिकारी उपस्थित होते. भारताच्या संविधानाची गौरवशाली अमृत महोत्सवी वाटचालफ या ऐतिहासिक पर्वानिमित्त दिनांक २६ मार्च २०२५ रोजी विधानसभेत भारताच्या संविधानाची गौरवशाली अमृत महोत्सवी वाटचाल या विषयावर सभागृहात चर्चा झाली होती. या वेळी झालेल्या चर्चेला उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेल्या भाषणाचे पुस्तक स्वरूपातील संकलन महाराष्ट्र विधिमंडळ वि.स. पांगे संसदीय प्रशिक्षण केंद्राच्या पुढाकारातून करण्यात आले आहे. हा पुस्तक प्रकाशन सोहळा मंगळवार दिनांक ९ डिसेंबर २०२५ रोजी राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या हस्ते प्रकाशित करण्यात येणार आहे असे विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी बैठकीत सांगितले.

# बुलढाण्यातील बोगस मतदारांच्यासंदर्भात जिल्हा प्रशासनाने कठोर कारवाई करावी - शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाची मागणी

## मतदारांच्या नावाने बोगस आधार कार्ड तयार करणाऱ्यांचा शोध घ्या

जनसंचलन/ बुलढाणा

राज्यभर माध्यमांमधून काल बुलढाणा शहर आणि बोगसमतदारांचा विषय चर्चेत राहिला. मतदारांच्या नावाने फोटो बदलून बोगस आधार कार्ड तयार करण्यात आले आहेत. अनेक ठिकाणी अशा प्रकारे मतदान करायला आलेल्यांना पकडण्यात आले आहे. एक-दोन ठिकाणी गुन्हे देखील दाखल झाले आहे. बोगस मतदारांच्या आधार कार्डच्या संदर्भात हे कुणी तयार केले आणि असे किती आधार कार्ड आहेत याचा शोध जिल्हा प्रशासनाने घेऊन कठोरात कठोर कारवाई करण्याची मागणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे ) पक्षाच्या शिष्टमंडळाने आज जिल्हा प्रशासनाकडे केली आहे. शिवसेनेच्या राज्यप्रवक्ता सौ जयश्रीताई शेळके, जिल्हाप्रमुख जालिंदर बुधवत, सहसंपर्कप्रमुख डी एस लहाने, पंचायत समितीचे माजी सभापती सुधाकर आघव, गजानन धांडे, शहर प्रमुख नारायण हेलगे यांच्यासह निवडणूक लढवणाऱ्या प्रमुख उमेदवारांनी आज अपर जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन रीतसर निवेदन सादर करण्यात आले. बुलढाणा नगरपरिषदेसाठी काल २ डिसेंबर २०२५ रोजी १५ प्रभागांमध्ये थेट नगराध्यक्ष व नगरसेवक पदांसाठी मतदानाची प्रक्रिया पार पडली. काल प्रत्यक्ष बोगस मतदारांना अनेक ठिकाणी पकडण्यात आलं. महत्वाचं म्हणजे बोगस मतदान करण्यासाठी आलेल्या व्यक्तीजवळ संबंधित मतदाराच्या नावाचं आधार कार्ड आणि मतदान कार्ड सुद्धा मिळून आल्याचे दिसून आले. त्यावर नाव मतदार यादीतील मतदाराचे आणि फोटो मतदान करायला येणाऱ्या बोगस मतदाराचा असल्याचे दिसून आले. सोशल मीडियावर बरेचसे व्हिडिओ देखील या संदर्भात व्हायरल झाले आहे. यासंदर्भात तात्काळ कारवाई होणे गरजेचे आहे. यातील एका प्रकरणात गुन्हा दाखल झालेला आहे. केवळ गुन्हा दाखल होऊन चालणार नाही तर यात कठोरात कठोर कारवाई होणे आवश्यक आहे. तसेच मोठ्या प्रमाणात बोगस आधार कार्ड



आणि बोगस मतदान कार्ड देखील तयार करण्यात आले आहेत. हे कुठे तयार करण्यात आले याचा देखील तपास होणे लोकशाही वाचवण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. तसेच या प्रकरणांचा कर्ता करविता आणि सूत्रधार कोण आहे, याचाही शोध प्रशासनाने घेऊन या संदर्भात कठोर पावले उचलावी ही मागणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने करण्यात आली. यावेळी अशोकमामा गव्हाणे, समाधान हिवाळे, सुनील भाग्यवंत, सुनील सपकाळ, राजेश ठोंबरे , सुभाष पवार, कुणाल पैठणकर, विजय राऊत, गजानन गवई, मोहित भंडारी, निलेश हरकल, निलेश तायडे, शैलेश जुंबड यांच्यासह शिवसैनिक उपस्थित होते.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====

संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८